पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25


विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १८० । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | रविवार २६/०७/२०२६ । पाने - ८

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

## संवाद साधा, हुकूमशाही नको
## मोहन भागवतांचा सरकारला कानमंत्र

### शिक्षणमंत्र्यांच्या राजीनामा मागणीसाठी संघर्ष तीव्र



नवी दिल्ली (प्रतिनिधी) - गेल्या महिनाभरापासून दिल्लीतील जंतर-मंतर येथे सीजेपीच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरू असून, आता या आंदोलनाने अधिक आक्रमक वळण घेतले आहे. सुरुवातीला सरकारकडून आंदोलनाची दखल न घेतल्याचा आरोप करत आंदोलक विद्यार्थ्यांनी संसदेला घेराव घातला. त्यानंतर झालेल्या गोंधळात हिंसाचार उसळला असून अनेक विद्यार्थी जखमी झाले आहे.

या पार्श्वभूमीवर सीजेपीचे नेते अभिजित दिपके यांनी, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय माघार नाही, असा ठाम इशारा दिला आहे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, विरोधी पक्षांनीही या आंदोलनाला पाठिंबा देत सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. कोणत्याही परिस्थितीत शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा झालाच पाहिजे, अन्यथा देशभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा विरोधकांनी दिला आहे. या वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही सरकारला अप्रत्यक्षपणे महत्त्वाचा सल्ला दिला आहे. विद्यार्थ्यांवर हुकूमशाही लादू नका, त्यांना आदेश देण्यापेक्षा त्यांच्याशी संवाद साधा, असे आवाहन करत त्यांनी सरकारने संवादाचा मार्ग स्वीकारण्याची गरज अधोरेखित केली. एका बाजूला मोदी सरकारने धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा प्रश्न प्रतिष्ठेचा बनविल्याचे चित्र दिसत असताना, दुसरीकडे आंदोलक विद्यार्थ्यांनीही हा लढा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि स्वाभिमानाशी जोडला असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे दोन्ही बाजू आपापल्या भूमिकेवर ठाम असल्याने संघर्ष अधिक तीव्र होत असल्याचे दिसून येत आहे. देशभर या आंदोलनाचे पडसाद उमटू लागले असून, एका बाजूला विद्यार्थी शिक्षणाशी संबंधित प्रश्नांवर आंदोलन करत आहेत, तर दुसऱ्या बाजूला सरकारचे समर्थक वेगळी भूमिका घेत आहेत. त्यामुळे वातावरण दिवसेंदिवस अधिक तापत असून संघर्षाची तीव्रता वाढत चालली आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, या प्रश्नावर सरकारने वेळेत संवादाचा मार्ग स्वीकारला नाही तर परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा स्थितीत मोहन भागवत यांनी केलेल्या संवादाच्या आवाहनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, आता सरकार पुढे कोणती भूमिका घेते याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

अर्थ | आरोग्य | अध्यात्म
KADLAG
INVESTMENT
...Dreams make sense...
कडलग इन्व्हेस्टमेंट आयोजित
विशेष
आर्थिक साक्षरता
मेळावा-2026
गुरुवार, दि. 30 जुलै 2026 रोजी सायं. 6 वा.
मालपाणी हेल्थ क्लब, कासारवाडी, संगमनेर 422 605
उद्घाटक : डॉ. ओमप्रकाश सिकची (माजी चेअरमन, संगमनेर मर्चंट्स को-ऑप बँक लि.)
विषय : जागतिक घडामोडी आणि म्युच्युअल फंड गुंतवणूकदार...काल, आज आणि उद्या
प्रमुख वक्ते : मा.श्री. पलक शाह (गुंतवणूकदार वर्तन तज्ज्ञ)
प्रमुख उपस्थिती : मा.श्री. विक्रमसिंह परदेशी (रिजनल मॅनेजर, एन. जे. वेल्थ, नाशिक)
म्युच्युअल फंड सेवेला 20 वर्षे पूर्ण
तसेच 200 कोटींचा AUM व दोन कोटींची SIP बुक
हा टप्पा पूर्ण केल्याबद्दल आपल्या सर्वांना या मेळाव्यासाठी आमंत्रित करीत आहोत
आपले विनीत
आदित्य कडलग (डायरेक्टर, कडलग इन्व्हेस्टमेंट, संगमनेर)
सुनील कडलग (संस्थापक, कडलग इन्व्हेस्टमेंट, संगमनेर)
नोंदणीसाठी खालील नंबरवर संपर्क करा
स्वाती : 9150 306 306 । आकांक्षा :9150 304 304
शुभम : 9142 55 9000 । प्रतिक्षा : 9142 66 8000 । मानसी : 9142 77 3000
एस.5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरियल, संगमनेर, जि. अहिल्यानगर

## भंडारदरा परिसरात ढगफुटी सदृश पाऊस

### कळसुबाई शिखराजवळ दरड कोसळल्याने भातशेती उद्ध्वस्त





आदिवासी जनजीवन विस्कळीत



राजूर (प्रतिनिधी) भंडारदरा पाणलोट क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे कळसुबाई शिखराजवळ मोठी दरड कोसळली असून पांजरे परिसरातील ३० ते ४० एकर भातशेती गाडली गेली आहे. ओढ्यांनी मार्ग बदलल्याने गांगडवाडीतील घरांमध्ये गाळयुक्त पाणी शिरले आहे. दरम्यान, भंडारदरा धरण भरण्याच्या मार्गावर असून प्रवरा नदीत १० हजार क्युसेक्सपर्यंत विसर्ग सोडण्यात आला आहे. पांजरे गावाजवळील कळसुबाई शिखराजवळील डोंगराची दरड कोसळण्याचा प्रकार शुक्रवारी सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडला. या घटनेमुळे डोंगरावरील झाडे उन्मळून थेट ओढ्यातून वाहत पांजरे परिसरात आली. दरडीच्या दगडगोट्यांमुळे ओढ्यांनी मार्ग बदलला, तर अनेक शेतकऱ्यांचे शेतीचे बांध फुटून भातशेती वाहून गेली आहे. ही घटना महसूल विभागाला कळवल्यानंतर तात्काळ प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. वन्यजीव विभाग, पोलीस प्रशासन, महसूल विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी या घटनेची पाहणी केली.

गेल्या तीन ते चार दिवसांपासून भंडारदरा धरणाच्या पाणलोटात अतिवृष्टी होत असल्याने भंडारदरा धरण भरण्याच्या मार्गावर आहे. भंडारदरा धरणाचा पाणीसाठा शनिवारी सकाळी ६ वाजता१०,००१ दलघफूट झाला असून धरणाच्या सांडव्यामधून ९६२८ क्युसेक्सने विसर्ग प्रवरा नदीमध्ये सोडला जात आहे. गेल्या २४ तासांत भंडारदरा येथे १०९ मिमी, पांजरे १८९ मिमी, घाटघर १९५ मिमी, रतनवाडी १५५ मिमी, तर वाकी येथे १२२ मिमी पाऊस झाला. निळवंडे धरणामध्ये भंडारदरा धरणामुळे पाणी विसर्जित होत असल्याने धरण ७८.७४ टक्के भरले असून धरणाचा पाणीसाठा ६५६३ दलघफूट झाला आहे.

तालुक्यात तीन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. वादळी पावसामुळे झाडे पडली. विजेचे खांब पडले, तारा पडल्या. अनेक ठिकाणी घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली. रंधा, फोफसंडी, मुतखेल, सावरकुटे, शिरपुंजे, आंबेवंगण, भंडारदरा, कुमशेत, मुथाळणे, धामणगाव पाट, धामणवन, लाडगाव, रतनवाडी आदी गावांमध्ये १२५ पेक्षा अधिक घरांची पडझड झाली. तर काही शेतकऱ्यांची जनावरे ही अतिवृष्टीमुळे दगावली आहेत.

पांजरे येथील पाटीलवाडीपासून अंदाजे २ ते ३ किलोमीटर 'अंतरावरील लगतच्या डोंगरावरील दरड कोसळली. त्यामुळे माती व झाडे वाहून आल्याने पाण्याच्या प्रवाह बदलला गेला.

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

ADVANCE GOLD SIP SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
नियम व अटी लागू
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# कै. सौ. पुष्पा विजय सुर्यवंशी यांना भावपूर्ण श्रध्दांजली !

## आईच्या त्यागाची गाथा : संघर्ष, संस्कार आणि अमर स्मृती





आई... तुझ्या संघर्षाला शतशः प्रणाम!

कॅन्सर हरला नाही... पण एका आईचं मातृत्व मात्र अमर झालं

आई हा शब्द उच्चारला की डोळ्यांसमोर उभी राहते ती मायेची सावली, त्यागाची मूर्ती आणि संकटातही कुटुंबासाठी खंबीरपणे उभी राहणारी एक अद्भुत शक्ती. आईच्या प्रेमाची किंमत शब्दांत मांडणे अशक्य आहे. तिच्या कष्टांची, त्यागाची आणि संघर्षाची उंची मोजणे कोणालाही शक्य नाही. अशीच एका असामान्य आईची ही प्रेरणादायी आणि हृदय पिळवटून टाकणारी जीवनगाथा आहे.

अवघ्या चौदाव्या वर्षी संसाराची जबाबदारी खांद्यावर घेऊन तिने आयुष्याची खरी परीक्षा सुरू केली. सन १९८९ मध्ये विजय सूर्यवंशी यांच्याशी विवाह झाल्यानंतर मोठा संयुक्त परिवार, सासू-सासरे, तीन दीर, दोन नणंद अशा अनेक नात्यांची जबाबदारी तिच्यावर आली. त्या वयात स्वतःची स्वप्ने पाहण्याऐवजी तिने संपूर्ण कुटुंबाची स्वप्ने पूर्ण करण्याचा संकल्प केला.

घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. मात्र परिस्थितीपुढे हार मानणे तिच्या स्वभावात नव्हते. कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे म्हणून तिने विड्या बनविण्याचे काम सुरू केले. दिवस-रात्र कष्ट करून संसाराचा गाडा पुढे नेला. स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार न करता प्रत्येक रुपया कुटुंबासाठी खर्च केला. तिच्या कष्टांच्या घामानेच त्या घराचा पाया अधिक मजबूत होत गेला.

नणंद संगीता आणि रंजना तसेच दीर विलास यांच्या संसारातही तिने आईसारखी साथ दिली. प्रत्येकाला उभे राहण्यासाठी वेळोवेळी मदतीचा हात दिला. स्वतःच्या कुटुंबापुरते मर्यादित न राहता संपूर्ण घराला एकत्र बांधून ठेवण्याचे मोठे कार्य तिने आयुष्यभर केले. स्वतःचे शिक्षण केवळ आठवीपर्यंत झाले होते. परंतु शिक्षणाचे महत्त्व तिने आयुष्यभर जपले. आपल्या मुलांना आपण भोगलेल्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी तिने शिक्षणालाच सर्वोच्च प्राधान्य दिले. कोणतीही परिस्थिती असो, मुलांचे शिक्षण कधीही थांबू दिले नाही. प्रत्येक संकटावर मात करत मुलांना पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून दिले.

तिच्या अथक परिश्रमांचे फळ आज संपूर्ण कुटुंबाला मिळाले. तुषार आणि किर्ती हे कृषी अधिकारी म्हणून कार्यरत झाले, तर विशाल प्रतिष्ठित छङ्ग्ङ्क कंपनीत व्यवस्थापक पदावर कार्यरत आहे. दहा बाय दहा फुटांच्या छोट्याशा भाड्याच्या घरातून सुरू झालेला प्रवास पुढे मुलांच्या स्वतःच्या घरापर्यंत पोहोचला. हा प्रवास केवळ आर्थिक प्रगतीचा नव्हता, तर एका आईच्या स्वप्नांचा विजय होता. संपूर्ण कुटुंब आनंदात होते. सुना, नातवंडे आणि घरातील प्रत्येक सदस्याच्या चेहऱ्यावर समाधान होते. पण नियतीला काही वेगळेच मान्य होते.

१८ मे २०२३ रोजी तिच्या आयुष्यात कॅन्सरचे भीषण संकट आले. हा शब्द ऐकून अनेक जण मानसिकदृष्ट्या खचून जातात. मात्र ती खचली नाही. उलट अधिक धैर्याने उभी राहिली. हा आजार माझ्यावर राज्य करणार नाही, हा निर्धार करून तिने मृत्यूशीच जणू सामना सुरू केला.

उपचारासाठी मुंबई येथील टाटा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. शिक्षण कमी असले तरी उपचारांची प्रत्येक माहिती ती स्वतः समजून घेत होती. डॉक्टरांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट काळजीपूर्वक ऐकून ती काटेकोरपणे पाळत होती. औषधे, तपासण्या, उपचार, शस्त्रक्रिया-प्रत्येक टप्प्यावर तिचा आत्मविश्वास कायम होता.

या लढ्यात तब्बल नऊ शस्त्रक्रिया आणि पंचावन्न केमोथेरपी तिने स्वीकारल्या. तीन वर्षे ती मृत्यूशी झुंज देत राहिली. प्रत्येक वेदना शांतपणे सहन करत ती कुटुंबाला धीर देत होती. तिच्या चेहऱ्यावर दुःखापेक्षा जगण्याची जिद्द अधिक दिसत होती. कुटुंबालाही वाटू लागले होते की ती हा लढा नक्की जिंकेल.

परंतु मार्च २०२६ मध्ये निमोनियाचा गंभीर आघात झाला. त्यानंतर तिची प्रकृती अधिकच खालावली. डॉक्टरांनी पुन्हा केमोथेरपीची आवश्यकता सांगितली; मात्र शरीराची ताकद कमी होत चालली होती. तरीदेखील उपचार थांबवण्याचा विचार तिच्या मनात कधीच आला नाही. शेवटच्या श्वासापर्यंत ती जगण्यासाठी लढत राहिली.

साडेतीन वर्षे मृत्यूशी संघर्ष केल्यानंतर १७ जुलै २०२६ रोजी तिला आपल्या प्रवासाचा शेवट जवळ आल्याची जाणीव झाली. त्या क्षणीही तिच्या तोंडी स्वतःसाठी कोणतीही तक्रार नव्हती. तिची शेवटची विनंती होती- मार्च २०२६ ला निमोनियाने आघात केला. त्यानंतर तिची तब्येत खालावली. त्यात केमो थेरपी करावी लागेल असे डॉक्टरांनी सांगितले. शरीर कमजोर असल्याने परिस्थिती बिकट होत गेली. पण नाही तिला जिंकायचे होते. तिने सर्व उपचार घेण्याचा निर्णय घेतला परंतु ३ वर्षे ४ महिने लढा दिल्यानंतर तिला १७ जुलै २०२६ तिला समजले की, मी हरणार आहे. आम्हाला म्हटले देवाला सांगा माझा त्रास कमी करायला, मला घरी घेऊन चला. आईची सहनशक्ती अद्भुत जगण्याची इच्छाशक्ती तिचे शेवटचे वाक्य

मी हरले आणि कॅन्सर जिंकला

वयाच्या ५३ व्या वर्षी या जगाचा निरोप देतांना अश्रुचा अथांग समुद्र माझ्या डोळ्यात होता पण दुरदुर पर्यंत ती दिसत नव्हती अशी आमची आई...आम्हाला किनाऱ्यावर सोडून निघुन गेली. तच्या जाण्याने कुटुंबाची केवळ एक व्यक्ती हरपली नाही; तर त्या घराचे छत्र, आधार, माया आणि प्रेरणेचा अखंड झरा हरपला. आजही घरातील प्रत्येक वस्तूमध्ये तिच्या कष्टांचा, त्यागाचा आणि प्रेमाचा सुगंध दरवळतो. प्रत्येक यशामध्ये तिचे संस्कार आहेत आणि प्रत्येक संघर्षात तिची शिकवण उभी आहे.

लोक म्हणतील, कॅन्सर जिंकला. पण खरे पाहता कॅन्सर एका शरीरावर विजय मिळवू शकला; तिच्या जिद्दीवर, मातृत्वावर, संस्कारांवर आणि प्रेमावर मात्र तो कधीच विजय मिळवू शकला नाही. ती आज आपल्या सोबत नसली, तरी तिने घडवलेली माणसे, दिलेले संस्कार आणि दाखवलेला संघर्षाचा मार्ग पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील.







## कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर

### शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅकवर नोंदणी आणि आधार प्रामाणित करण्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे आवाहन

मुंबई (प्रतिनिधी) - राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना - २०२६' अंतर्गत १६ लाख ९६ हजार पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली असून उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या याद्याही लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. या योजनेअंतर्गत राज्यातील सुमारे ५६ लाख पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. पात्र शेतकऱ्यांनी लाभ मिळविण्यासाठी ग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरण प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.



योजनेतील पात्र लाभार्थ्यांची यादी संबंधित बँकांनी महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली असून त्याची पडताळणी पूर्ण झाली आहे. आधार प्रमाणीकरणासाठी पात्र शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे सूचना पाठविण्यात येणार आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालये, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आणि संबंधित बँक शाखांमध्येही लाभार्थ्यांच्या याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. योजनेतील प्रत्येक पात्र लाभार्थ्याला एक विशिष्ट ओळख क्रमांक देण्यात येणार आहे. आधार क्रमांक किंवा या विशिष्ट क्रमांकाच्या आधारे आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक राहणार असून, राज्यातील सुमारे ३२ हजार 'आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ग्रीस्टॅकवरील नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यात डीबीटी प्रणालीद्वारे कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येणार आहे. ही योजना केवळ कर्जमुक्ती पुरती मर्यादित नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून नव्या उमेदीने शेतीसाठी बळ देणारी योजना असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# वारकऱ्यांचे आशीर्वाद हीच संपत्ती - डॉ. सुजय विखे पाटील

## जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून रेनकोट व शबनम बॅगचे वाटप



पंढरपूर (प्रतिनिधी) - वारकरी बांधवांचे प्रेम आणि आशीर्वाद हीच आमची खरी संपत्ती असून समाजसेवा आणि वारकरी सेवेला विखे पाटील परिवाराने नेहमीच प्राधान्य दिले आहे. आषाढी वारीच्या निमित्ताने ही सेवाभावाची परंपरा अधिक सक्षमपणे पुढे सुरू ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन त्यांनी राज्यातील जनतेच्या सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली.

यानिमित्ताने डॉ. सुजय विखे पाटील यांनी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील स्मृती मंडळाच्या भक्तनिवास मठात मुक्कामी असलेल्या वारकरी दिंड्यांना भेट देत वारकरी बांधवांशी संवाद साधला. आषाढी वारीदरम्यान अहिल्यानगर, नाशिक तसेच राज्यातील विविध भागांतून पायी पंढरपूरला येणाऱ्या वारकरी बांधवांसाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील स्मृती मंडळाच्या सुमारे सात हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या भव्य मंडप व भक्तनिवास मठात मुक्कामाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून निवास, भोजन, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वैद्यकीय मदत तसेच इतर आवश्यक सुविधा नियोजनबद्ध पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सध्या चाळीसहून अधिक वारकरी दिंड्या या भक्तनिवासात मुक्कामी असून हजारो वारकरी या सुविधांचा लाभ घेत आहेत. पंढरपूरमधील सर्वात मोठ्या आणि सुसज्ज वारकरी सेवा मंडपांपैकी हा एक मंडप असून, वारकऱ्यांच्या सेवेसाठी स्वयंसेवक चोवीस तास कार्यरत आहेत. यावेळी जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जनसेवा फाउंडेशनच्या वतीने वारकरी बांधवांना १५ हजारांहून अधिक रेनकोट आणि शबनम बॅगचे वितरण करण्यात आले. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते या साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, वीस ते पंचवीस दिवसांचा पायी प्रवास करून वारकरी पंढरपूरमध्ये दाखल होतात. त्यांच्या मुक्कामाची, सुरक्षिततेची आणि सर्व सोयी-सुविधांची उत्तम व्यवस्था व्हावी, यासाठी विखे पाटील परिवार आणि जनसेवा फाउंडेशन गेल्या ४० वर्षांपासून अविरतपणे कार्यरत आहे. वारकऱ्यांच्या सेवेत कोणतीही उणीव राहू नये, हीच आमची भूमिका असून त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि मिळणारे आशीर्वाद हीच आमची खरी संपत्ती आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने विखे पाटील परिवाराने सर्व वारकरी भक्तांना शुभेच्छा देत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या कृपेने प्रत्येकाच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी आणि समाधान नांदो, अशी प्रार्थना केली.

# भटक्या श्वानांसाठी संगमनेर नगरपरिषदेचा राज्यातील पहिला व स्तुत्य उपक्रम




संगमनेर (प्रतिनिधी) - भटक्या श्वानांच्या प्रश्नावर संगमनेर नगरपरिषदेने राज्यात पहिल्यांदाच एक महत्त्वाचा उपक्रम सुरू केला आहे. निर्बीजीकरण शस्त्रक्रिया आणि अँटी रेबीज लसीकरण केल्यानंतर प्रत्येक भटक्या श्वानाला मायक्रोचिप बसविण्याचा हा महाराष्ट्रातील पहिलाच उपक्रम आहे. त्यामुळे श्वानांची ओळख ठेवणे, त्यांचा मागोवा घेणे आणि त्यांची योग्य काळजी घेणे अधिक सोपे होणार आहे.

शहरातील भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात ठेवणे, रेबीजचा धोका कमी करणे आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे, या उद्देशाने संगमनेर नगरपरिषदेने ही योजना सुरू केली आहे. यामध्ये प्राण्यांची काळजी आणि नागरिकांची सुरक्षितता या दोन्ही गोष्टींना समान महत्त्व देण्यात आले आहे. शहरातील विविध भागांतून आणलेल्या प्रत्येक श्वानाची प्रथम पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी केली जाते. शस्त्रक्रियेसाठी योग्य असलेल्या श्वानांवर निर्बीजीकरण करून त्यांना अँटी रेबीज लस दिली जाते. मात्र, गर्भवती किंवा नुकतीच पिल्लांना जन्म दिलेले तसेच आरोग्याच्या कारणामुळे शस्त्रक्रिया करता येणार नाही, असे श्वान असल्यास त्यांच्यावर कोणतीही शस्त्रक्रिया न करता त्यांना पुन्हा त्याच परिसरात सोडण्यात येते. शस्त्रक्रियेनंतर काही दिवस श्वानांची विशेष काळजी घेतली जाते. ते पूर्णपणे बरे झाल्यानंतर त्यांना मायक्रोचिप बसविली जाते. त्यानंतर संबंधित श्वानाला ज्या भागातून आणले होते, त्याच ठिकाणी सुरक्षितपणे सोडले जाते. या उपक्रमामुळे भटक्या श्वानांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन होण्यास मदत होत आहे. तसेच रेबीजचा धोका कमी करण्यास, नागरिकांचा त्रास कमी करण्यास आणि प्राण्यांबाबत संवेदनशील दृष्टीकोन जपण्यासही हातभार लागत आहे.

राज्यात अशा प्रकारचा उपक्रम सुरू करणारी संगमनेर नगरपरिषद ही पहिली नगरपरिषद ठरली असून, या उपक्रमाची दखल इतर शहरांकडूनही घेतली जात आहे

# कोतुळच्या स्वप्निल बोऱ्हाडेची MSF मध्ये निवड



राजूर/प्रतिनिधी अकोले तालुक्यातील कोतुळ गावातील संजय निवृत्ती बोऱ्हाडे यांचे सुपुत्र स्वप्निल बोऱ्हाडे यांची MSF मध्ये झालेली निवड झाली. ही निवड संपूर्ण कोतुळ व अकोले तालुक्यासाठी अभिमानाची आणि प्रेरणादायी घटना आहे. कोतुळ सारख्या दुर्गम गावातून त्याने जिद्द, अथक परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले. विविध स्पर्धा परीक्षांना तोंड देऊन हार न मानता यश संपादन केले. कोतुळ येथे कष्टकरी व सलून व्यवसाय करित वडिलांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत दिवस-रात्र मेहनत करून मुलाच्या शिक्षणाचे स्वप्न जिवंत ठेवले, आणि आज त्या त्यागाचे खऱ्या अर्थाने सोनं झालं.

स्वप्निलचे हे यश दुर्गम अकोले भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची प्रेरणा देणारे आहे. स्वप्निल संजय बोऱ्हाडे यांचे सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयात स्व. अजितदादा पवार यांची जयंती भावपूर्ण वातावरणात साजरी




संगमनेर (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. मा. ना. अजितदादा पवार यांच्या निधनानंतर, अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर येथे त्यांची जयंती स्मृती अभिवादन दिन म्हणून अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे व उपस्थितांनी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या पावन स्मृतीस भावपूर्ण आदरांजली वाहिली. महाराष्ट्राच्या विकासातील, विशेषतः पायाभूत सुविधा, सहकार, प्रशासकीय शिस्त आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांचे मोलाचे योगदान व दूरदृष्टी याबद्दल उपस्थितांनी कृतज्ञतापूर्वक आठवणींना उजाळा दिला.

या स्मृती अभिवादन कार्यक्रमास अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, संस्थेचे संचालक (शैक्षणिक) डॉ. जे. बी. गुरव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर आणि रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी महाविद्यालयातील सर्व विभागांचे विभागप्रमुख प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टीईटी पेपर फुटीतील मुख्य आरोपी विजेंद्र गुप्ताला बिहारमधून अटक

## दीड कोटींना विकली प्रश्नपत्रिका




महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदमार्फत २८ जून रोजी राज्यभरात आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ (टीईटी) या परीक्षेचा पेपर फुटल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपी बिजेंद्र गुप्ताला ठाणे पोलिसांनी बिहारमधून अटक केली आहे. महिन्याभरापासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या गुप्ताला अखेर पोलिसांनी जेरबंद केले. पोलिसांनी गुप्ताला पुणे विमानतळावर आणले असून पुढील तपासासाठी त्याला लवकरच भिवंडीला नेण्यात येणार आहे.

टीईटी पेपरफुटी प्रकरणात गुप्ताची पत्नी सुमन गुप्ता यांच्यासह अनेकांना अटक करण्यात आली आहे. पेपरफुटीच्या साखळीचे काम सुरळीत करण्यासाठी सुमन गुप्ताने भूमिका बजावली असल्याचा संशय पोलिसांना आहे. यामुळे तिच्या सहभागाची चौकशी सुरू आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे रविवार, दिनांक २८ जून रोजी राज्यभरातील १०२८ केंद्रांवर आयोजित करण्यात आली होती. देशभर गाजलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणानंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने सुरक्षेच्या दृष्टीने विशेष उपाययोजना केल्या होत्या. मात्र तरीही पेपरफुटीची घटना घडली.

दीड कोटींना विकली गेली प्रश्नपत्रिका

टीईटीचे पेपर फुटल्यानंतर भिवंडी येथे अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी पत्रकार परिषद घेत या प्रकाराचा माहिती दिली. टीईटी परीक्षेचा पेपर तब्बल दीड कोटी रुपयांना विकला जाणार होता, अशी धक्कादायक माहिती त्यांनी दिली. तसेच या प्रकरणी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना भिवंडीतील कोनगाव परिसरातून ताब्यात घेण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले होते. अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक दुधे यांनी सांगितले की, ताब्यात घेण्यात आलेल्या तीन आरोपींपैकी एक आरोपी हरियाणाचा तर दोन आरोपी बिहारचे रहिवासी आहेत. हे तिघेही दिल्लीहून महाराष्ट्रात आले होते. या कारवाईदरम्यान संशयितांकडून प्रश्नपत्रिकेशी संबंधित कागदपत्रे आणि साहित्य जप्त करण्यात आले आहे. प्रश्नपत्रिका नेमकी कुठून मिळाली, ती कोणाकडून आरोपींपर्यंत पोहोचली आणि ती नेमकी कोणाला विकली जाणार होती, याचा सध्या सखोल तपास सुरू असल्याचे दुधे यांनी सांगितले होते.

# अमृतवाहिनी मॉडेल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घेतला वृक्षदिंडीचा आनंद



घुलेवाडी (प्रतिनिधी) अमृतवाहिनी मॉडेल स्कूलच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थी व शिक्षक अमृतेश्वर मंदिर येथे वृक्षदिंडीत सहभागी झाले होते. तर प्राथमिक विभागातील विद्यार्थी व शिक्षक घुलेवाडी फाटा ते घुलेवाडी परिसरातील ग्रामदैवत मंदिरापर्यंतच्या दिंडीत उत्साहाने सहभागी झाले. या प्रसंगी घुलेवाडीच्या सरपंच सौ. निर्मलाताई राऊत, सदस्य श्री. चंद्रकांत क्षीरसागर, युवा कार्यकर्ता ऋत्विक राऊत तसेच इतर सदस्य उपस्थित होते. मान्यवरांनी दिंडीचे स्वागत करून विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

या वृक्षदिंडीत चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध संतांची वेशभूषा करून दिंडीची शोभा वाढवली. हरिनामाचा गजर करत विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या दिंडीमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. शहरातील तसेच मंदिर परिसरातील नागरिकांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विठ्ठल नामाचा गजर करत, टाळ-मृदंगाच्या तालावर पावले टाकत वारकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी हातातील फलकांद्वारे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला. जनजागृती करताना महाराष्ट्राच्या वैभवशाली वारकरी परंपरेचे दर्शन अमृतवाहिनी मॉडेल स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घडविले.

सदर कार्यक्रमाचे अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे माजी महसूलमंत्री मा. बाळासाहेब थोरात, संस्थेच्या विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल शिंदे, व्यवस्थापक-प्राचार्य श्री. व्ही. बी. धुमाळ, डायरेक्टर अकॅडमिक श्री. जे. बी. गुरव सर, प्राचार्य श्री. आशिषकुमार सर तसेच सर्व विभागप्रमुख यांनी कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. वृक्षदिंडी यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले

# आढाळा कालव्याला पाणी सुटले

## आ. अमोल खताळ यांचा शेतकऱ्यांना सकारात्मक प्रतिसाद

संगमनेर (प्रतिनिधी) अकोले तालुक्यातील देवठाण येथील आढाळा धरण पूर्ण क्षमतेने भरून ओव्हरफ्लो झाले आहे , परिसरातील शेतकऱ्यांनी आमदार अमोल खताळ यांच्याकडे मागणी केली त्यानुसार आढळा धरणातून कालव्यात पाणी सोडण्याचा निर्णय झाला , त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे शिवसेनाचे बापूसाहेब देशमुख यांनी सांगितले.

देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आढाळा धरणातील पाणीसाठा समाधान कारक झाल्यानंतर कालव्यातून पाणी सोडण्याची मागणी परिसरातील अनेक शेतकरी करत होते. या पार्श्वभूमीवर आमदार अमोल खताळ व जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी संपर्क साधून शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या. त्यानंतर तातडीने निर्णय घेत कालव्यात पाणी सोडण्याच्या सूचना देण्यात आल्यात.या पाण्याचा लाभ आढाळा कालव्याच्या लाभक्षेत्रातील हजारो एकर शेतीला होणार असून, खरीप हंगामातील पिकांना मोठा आधार मिळणार आहे.



बापूसाहेब देशमुख

सध्या मका, सोयाबीन,डाळिंब बाजरी,कांदा टोमॅटो भाजीपाला सह इतर पिकांना पाण्याची आवश्यकता असल्याने कालव्याचे पाणी उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आ. अमोल खताळ यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने केलेल्या पाठ पुराव्यामुळेच आढाळा कालव्यात पाणी सोडण्याचा निर्णय झाला असल्यामुळे परिसरातीलशेतकर्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयाचा शेतीला थेट फायदा होणार असल्याचा विश्वास बापूसाहेब देशमुख यांनी व्यक्त केला.

# संपादकीय...

## ऑनलाइन फसवणूकीचे वाढते आव्हान

डिजिटल युगात इंटरनेट, स्मार्टफोन आणि ऑनलाइन सेवांनी मानवी जीवन अधिक वेगवान आणि सोयीचे केले आहे. बँकिंग, शिक्षण, आरोग्य, व्यवसाय, शासकीय सेवा आणि सामाजिक माध्यमे या सर्व क्षेत्रांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. मात्र, या प्रगतीबरोबरच सायबर सुरक्षा हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि चिंतेचा विषय बनला आहे. ऑनलाइन फसवणूक, डेटा चोरी, हॅकिंग आणि डिजिटल गोपनीयतेवरील हल्ले यामुळे व्यक्ती, संस्था आणि देशांच्या सुरक्षेलाही धोका निर्माण झाला आहे. ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस अधिक क्लिष्ट होत आहेत. बनावट बँक कॉल, खोट्या वेबसाइट्स, फिशिंग ई-मेल, सोशल मीडियावरील फसवे संदेश, बनावट गुंतवणूक योजना आणि ओटीपी मागून बँक खात्यातील पैसे चोरणे अशा अनेक मार्गांनी सायबर गुन्हेगार लोकांना जाळ्यात ओढतात. अनेक नागरिक जागरूकतेच्या अभावामुळे आपल्या आयुष्यभराची कमाई गमावतात. त्यामुळे कोणतीही वैयक्तिक किंवा बँकिंग माहिती अनोळखी व्यक्तीला देणे अत्यंत धोकादायक आहे.

डेटा चोरी ही आजच्या काळातील मोठी समस्या बनली आहे. मोबाईल ॲप्स, सोशल मीडिया, ई-कॉमर्स वेबसाइट्स आणि विविध ऑनलाइन सेवांवर आपण आपली वैयक्तिक माहिती, फोटो, आर्थिक व्यवहार आणि इतर संवेदनशील माहिती जतन करत असतो. ही माहिती चोरीला गेल्यास आर्थिक नुकसान, ओळखीचा गैरवापर आणि गोपनीयतेचा भंग होऊ शकतो. त्यामुळे मजबूत पासवर्ड, दोन-स्तरीय प्रमाणीकरण (Two-Factor Authentication) आणि विश्वासार्ह संकेतस्थळांचा वापर करणे आवश्यक आहे. हॅकिंग हा सायबर गुन्ह्यांचा आणखी एक गंभीर प्रकार आहे. हॅकर्स संगणक प्रणाली, बँकिंग नेटवर्क, शासकीय संकेतस्थळे, उद्योग आणि रुग्णालयांच्या संगणकांमध्ये घुसखोरी करून महत्त्वाचा डेटा चोरतात किंवा प्रणाली बंद पाडतात. अनेक वेळा खंडणी (Ransomware) मागण्यासाठीही संगणकातील माहिती एन्क्रिप्ट केली जाते. अशा हल्ल्यांमुळे आर्थिक नुकसान तर होतेच, शिवाय राष्ट्रीय सुरक्षेलाही धोका निर्माण होऊ शकतो.

सायबर सुरक्षेसाठी शासन, उद्योग आणि नागरिक यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती, डिजिटल साक्षरता, मजबूत कायदे, आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित तज्ज्ञांची आवश्यकता आहे. सुरक्षित डिजिटल जीवन हीच सुरक्षित भविष्याची गुरुकिल्ली आहे.

# डॉ. भानुदास जी. डेरे इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये आषाढी एकादशी भक्तिमय वातावरणात साजरी





## बालवारकऱ्यांच्या गजराने रोड दुमदुमला; विठ्ठल मंदिरात आरती करून राजगिरा लाडूंचे वाटप

संगमनेर (प्रतिनिधी): आज दिनांक २४ जुलै २०२६ रोजी संगमनेर येथील 'डॉ. भानुदास जी. डेरे इंग्लिश मिडीयम स्कूल ज्युनिअर कॉलेज, गुंजाळवाडी' मध्ये आषाढी एकादशी सण निमित्त अत्यंत उत्साह, भक्तिभाव आणि पारंपरिक थाटात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेत भव्य पायी आषाढी दिंडी आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेच्या संचालिका मा. सौ. अंकिता श्रीराज डेरे मॅडम यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी संपूर्ण परिसर 'राम कृष्ण हरी' च्या जयघोषाने भारावून गेला होता. पूजनानंतर विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर भजन, अभंग, लेझिम नृत्य आणि विठुरायाची महाआरती सादर केली. शाळेच्या प्रांगणातून निघालेली ही आषाढी दिंडी पाहण्यासारखी होती. हातामध्ये भगव्या पताका व ध्वज, गळ्यात तुळशीच्या माळा, कपाळावर टिळा आणि पारंपरिक पोशाखात सज्ज झालेले विद्यार्थी पुंडलिक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम असा जयघोष करत होते. या बालवारकऱ्यांच्या उत्साहामुळे संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाला होता. जणू काही पंढरपूरच संगमनेरमध्ये अवतरले आहे, असा भास उपस्थितांना होत होता.

शाळेच्या प्रांगणातून निघालेली ही भव्य दिंडी जुना अकोले बायपास रोड ने मार्गस्थ होत अकोले बायपास येथील विठ्ठल मंदिरात पोहोचली. मंदिरात सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी श्री विठ्ठलाची पूजा आणि आरती केली. आषाढी एकादशीच्या औचित्य साधून उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना व भाविकांना राजगिरा लाडूचे वाटप करण्यात आले. रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून नागरिकांनी या बालवारकऱ्यांचे दर्शन घेतले व विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. या सोहळ्यासाठी संगम सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. भानुदास जी. डेरे सर, उपाध्यक्ष ड. श्रीराज डेरे सर, संचालिका अंकिता श्रीराज डेरे मॅडम, शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. सुनिलकुमार शुक्ला सर, उपमुख्याध्यापक हरझिंद्र कौर बत्रा मॅडम, इन्चार्ज प्रज्ञा कुलकर्णी मॅडम व शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेची सेलिब्रेशन समितीचे सदस्य अर्चना सातपुते, सुरेखा कोटकर तसेच शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आषाढी एकादशीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप महिला मोर्चाचा 'देवाभाऊ कृषी माऊली सोहळा'




मुंबई (प्रतिनिधी) - राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या वतीने राज्यभर 'देवाभाऊ कृषी माऊली सोहळा' हा विशेष उपक्रम राबविण्यात येणार असून, महिला शेतकऱ्यांना शेतीत अधिक सक्षम आणि आत्मनिर्भर करण्याचा संकल्प या माध्यमातून साकारला जाणार आहे. या उपक्रमांतर्गत राज्यातील सुमारे ८ हजार महिला शेतकऱ्यांना मोफत कृषी किटचे वितरण करण्यात येणार असून, त्याचबरोबर माती परीक्षणाचे प्रात्यक्षिक व आधुनिक शेतीविषयक मार्गदर्शनही दिले जाणार आहे.

महिलांना शेतीत हक्क, सन्मान आणि निर्णय प्रक्रियेत स्थान मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आणलेल्या महिला शेतकरी विधेयकाच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आमदार चित्रा वाघ यांच्या संकल्पनेतून हा राज्यव्यापी सोहळा साकारत आहे.

यावेळी महिला शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक कापडी पिशवीत प्रगत भाजीपाला बियाणे, जैविक खते, खुरपे, विळा तसेच रात्रीच्या सुरक्षिततेसाठी टॉर्च अशा शेतीसाठी उपयुक्त साहित्याचा समावेश असलेले 'कृषी माऊली' किट मोफत देण्यात येणार आहे.

महिलांच्या श्रमाला सन्मान देत त्यांना आधुनिक शेतीची जोड देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम राज्यातील महिला शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास भाजप महिला मोर्चा अहिल्यानगर ग्रामिण सचिव सोनालीताई नाईकवाडी यांनी व्यक्त केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त होणाऱ्या या भव्य सोहळ्यासाठी राज्यभरातील महिला शेतकरी भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती महिला मोर्चाच्या वतीने देण्यात आली.

# आषाढी वारी व संत साहित्यातून मानवतेचा विचार – मा. मंत्री बाळासाहेब थोरात

## थोरात संगीत महाविद्यालयात अभंगवारीत संगमनेरकर मंत्रमुग्ध

संगमनेर ( प्रतिनिधी ) आषाढीवारीच्या पूर्वसंध्येला सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या वतीने झालेल्या अवघाची रंग एक झाला या अभंग व भक्ती गीतांच्या कार्यक्रमांमध्ये ४० विद्यार्थ्यांच्या एक सूर एक तालात झालेल्या विविध अभंगांमध्ये संगमनेरकर भाविक व रसिक मंत्रमुग्ध झाले. तर शेकडो वर्षांची परंपरा असलेली आषाढीवारी हे समतेचे व एकात्मतेचे प्रतीक असून संतसाहित्यातून मानवतेचा विचार समाजाला मिळाले असल्याचे प्रतिपादन वारकरी संप्रदायाचे पाईक तथा राज्याचे माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. के.बी.दादा सभागृहामध्ये सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या वतीने आयोजित अभंग व भक्ती गीतांचा सुरेल कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मा. महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, मा.आमदार डॉ.सुधीर तांबे, माजी नगराध्यक्ष सौ.दुर्गाताई तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात, सह्याद्री संस्थेचे सहसचिव प्रा.बाबा खरात, प्राचार्य डॉ.बाळासाहेब वाघ, प्राचार्य ज्ञानेश्वर गोंटे, सुरेश परदेशी,अनिल देशपांडे, डॉ.वाकचौरे, इनर व्हीलचे अध्यक्ष वैशाली चोपडे, डॉ.त्रिंबक राजदेव, इतिहास संवर्धक प्रा.शिंदे यांच्यासह जेष्ठ नागरिक संघ संगमनेर शहरातील विविध पदाधिकारी कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अवघा रंग एक झाला या भक्तीमय अभंग गीतांच्या कार्यक्रमाची सुरुवात संगीत महाविद्यालयाचे संचालक ह.भ.प.प्रा.विनोद राऊत यांनी भेटला विठ्ठल माझा भेटला विठ्ठल या




अभंगांने केली. त्यानंतर संत फार पंढरीत, आवडे हे रूप गोजिरे स्वरूप, ये जमीन है तेरी आसमा है तेरा, पांडुरंग पांडुरंग, सुखाचे जे सुख चंद्रभागे तिरी, नामदेव किर्तन करी प्रेम भरे नाचे पांडुरंग यांसह विविध अभंगांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. चाळीस विद्यार्थी व विद्यार्थिनींची सुरेल साथ आणि इतिहासाचे अभ्यासक प्रा.विठ्ठल शेवाळे यांचे सुंदर निवेदन यामुळे कार्यक्रम अत्यंत श्रवणीय झाला. या कार्यक्रमाला स्वप्नाली राऊत, गार्गी राऊत यांनी गायलेले अभंगांनाही प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. यावेळी सत्यजित सराफ, प्रताप राऊत, गणेश गोरडे, सौरभ रणधीर, वैभव पवार, अवधूत काळे,नानासाहेब गुंजाळ यांनी संगीत साथ दिली. या वारीने सर्वांना आनंदाची अनुभूती मिळते. सर्व जाती धर्माच्या संतांनी मानवतेचा मंत्र दिला असून त्यांच्या साहित्यामधून हा विचार जोपासला आहे. हे आनंदाचे परवा असून समतेचा संदेश देणारे असल्याचे थोरात म्हणाले. तर मा.आ.डॉ.तांबे म्हणाले की, संगीतामध्ये मोठी ताकद आहे. बौद्धिक सकारात्मकता वाढवण्यासाठी संगीत हे अत्यंत महत्त्वाचे आहे. मनशांतीसाठी अध्यात्म असल्याने लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून संगमनेर मधील श्रोत्यांसाठी हा अभंग वाणीचा कार्यक्रम संस्मरणीय ठरणारा झाला आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ.दुर्गाताई तांबे यांनी केले सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले तर डॉ.जयश्रीताई थोरात यांनी आभार मानले. यावेळी संगमनेर शहरातील विविध नागरिक महिला व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संगीत महाविद्यालयाच्या ४० विद्यार्थ्यांची सुरेल साथ

अभंग वाणी या कार्यक्रमांमध्ये सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या ३० विद्यार्थ्यांनी व दहा विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे सुंदर गीत गायन केले. यावेळी इतिहास संशोधक प्रा.विठ्ठल शेवाळे यांचे अभ्यासपूर्ण व रसाळ निवेदनाने कार्यक्रमाची रंगत भरली तर विनोद राऊत यांनी एकापेक्षा एक गायलेल्या सरस अभागांनी सर्व रसिक स्त्रोते मंत्रमुग्ध झाले. हरिनाम टाळ्यांच्या गजरामध्ये हा कार्यक्रम संगमनेर करांसाठी एक अध्यात्मिक पर्वणी ठरला.


**छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा**
8830508244
8380956604
7620388230

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME - GAUSIYA ABDULRGAUSIYA DESHMUKH
TO NEW NAME AS GAUSIYA ABDULRASHID DESHMUKH
ADDRESS - PAWBAKI ROAD, ITHAPE HOSPITAL JAWAL SANGAMNER, TAL SANGAMNER DIST AHMEDNAGAR

**पाहिजेत**
दुकान कामासाठी होतकरू मुले पाहिजेत.
हेल्पर / शिलाई कामगार
महिला - पुरूष
आकर्षक पगार दिला जाईल
अमोल कुशन्स
मार्केट यार्ड, संगमनेर
8805647610
8788483245

**तातडीने वॉचमन पाहिजे**
चालू बिल्डिंग साईटसाठी
विश्वासू व जबाबदार वॉचमन पाहिजे
ठिकाण: संगमनेर,
वेळ: सकाळी ८ ते संध्याकाळी ७
- संपर्क -
८८८८१४६६६१

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
8080548282
7498749500

**पाहिजेत**
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
- संपर्क -
8888808397

**फॅकल्टी पाहिजे** | **अगस्ती अकॅडमी संगमनेर**
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI – 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727









**पाहिजेत**
घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
9822304638

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
- संपर्क -
8788945208
8208223721

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

## दिनविशेष

२०१६: सोलार इम्पल्स २ — हे पृथ्वीभोवती फिरणारे पहिले सौर उर्जेवर चालणारे विमान ठरले.
२००८: अहमदाबाद बॉम्बस्फोट — या हल्ल्यात किमान ५६ लोकांचे निधन तर २०० पेक्षा जास्त लोक जखमी.
२००५: स्पेस शटल प्रोग्राम — STS-114 मिशन: डिस्कवरी उपग्रहाचे प्रक्षेपण.
२००५: मुंबई ढगफुटी — २४ तासांत ९९.५ सेंटीमीटर (३९.१७ इंच) पाऊस पडला, परिणामी पुरामुळे किमान ५,००० लोकांचे निधन.
१९९४: उस्ताद बिस्मिला खान — यांना राजीव गांधी सद्भावना पुरस्कार जाहीर.
१९७५: लिझ ट्रस — युनायटेड किंगडमच्या पंतप्रधान
१९७१: अपोलो कार्यक्रम — अपोलो १५ चे प्रक्षेपण करण्यात आले.
१९६५: मालदीव — देशाला युनायटेड किंग्डम आणि इंग्लंड पासून स्वातंत्र्य.
१९६३: सिन्कॉम २ — जगातील पहिला जिओसिंक्रोनस उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला.
१९६३: स्कोप्जे, युगोस्लाव्हिया भूकंप — येथे झालेल्या भूकंपात ११०० लोकांचे निधन

## जन्म

१९९२: राजवीर जावंदा — भारतीय पंजाबी गायक व अभिनेते (निधन: ८ ऑक्टोबर २०२५ )
१९८६: मुग्धा गोडसे — अभिनेत्री मॉडेल
१९७१: खलिद महमूद — बांगलादेशी क्रिकेटपटू
१९५५: आसिफ अली झरदारी — पाकिस्तानचे ११वे राष्ट्राध्यक्ष
१९५४: व्हिटास गेरुलायटिस — अमेरिकन लॉन टेनिसपटू (निधन: १७ सप्टेंबर १९९४ )
१९४९: थाकसिन शिनावात्रा — थायलंडचे पंतप्रधान
१९४२: व्लादिमिर मेसियर — स्लोव्हेकियाचे पंतप्रधान
१९३९: जॉन हॉवर्ड — ऑस्ट्रेलियाचे २५वे पंतप्रधान
१९२८: फ्रान्सिस्को कॉसिगा — इटली देशाचे ८वे राष्ट्राध्यक्ष, वकील आणि राजकारणी (निधन: १७ ऑगस्ट २०१० )
१९२८: इब्न-ए-सफ़ी — भारतीय-पाकिस्तानी लेखक आणि कवी (निधन: २५ जुलै १९८० )
१९२७: गुलाबराय रामचंद — भारतीय क्रिकेट खेळाडू
१८९४: अल्डस हक्सले — इंग्लिश लेखक (निधन: २२ नोव्हेंबर १९६३ )

## मृत्यू

८११: निसेफोरस — बायझेन्टाईन सम्राट
२०१५: बिजॉय कृष्णा हांडिक — भारतीय वकील आणि राजकारणी (जन्म: १ डिसेंबर १९३४ )
२०१०: शिवकांत तिवारी — भारतीय सिंगापुरियन राजकारणी (जन्म: २० डिसेंबर १९४५ )
१९५२: एव्हा पेरोन — अर्जेन्टिनाचे अध्यक्ष जॉन पेरोन यांची पत्नी
१८९१: राजेन्द्रलाल मित्रा — प्राच्यविद्या संशोधक, एशियाटिक सोसायटीचे पहिले अध्यक्ष (जन्म: १५ फेब्रुवारी १८२४ )
१८६७: ओट्टो — ग्रीसचा राजा
१८४३: सॅम ह्युस्टन — टेक्सासच्या प्रजासत्ताकचे राष्ट्राध्यक्ष
१३८०: कोम्यो — जपानी सम्राट




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२६ जुलै**


## २६ जुलै २००५ महापुराची ती भयावह रात्र : मुंबई कधीच विसरणार नाही



२६ जुलै २००५ हा दिवस मुंबईच्या इतिहासातील सर्वांत भीषण नैसर्गिक आपत्तींपैकी एक म्हणून ओळखला जातो. या दिवशी अवघ्या २४ तासांत मुंबईतील सांताक्रूझ वेधशाळेत तब्बल ९४४ मिलीमीटर (९४.४ सेंटीमीटर किंवा ३७.१७ इंच) पावसाची नोंद झाली. हा पाऊस भारतातील एका महानगरात २४ तासांत झालेल्या विक्रमी पावसांपैकी एक मानला जातो. अतिवृष्टीमुळे मुंबई, ठाणे, रायगड आणि आसपासच्या परिसरात भीषण पूरस्थिती निर्माण झाली.मुसळधार पावसामुळे रस्ते, रेल्वेमार्ग, विमानतळ आणि दळणवळण व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली. लाखो नागरिक कार्यालये, शाळा, महाविद्यालये आणि रेल्वे स्थानकांमध्ये अडकून पडले. अनेकांना रात्रभर रस्त्यावर, कार्यालयांमध्ये किंवा अनोळखी लोकांच्या घरांमध्ये आश्रय घ्यावा लागला. शहरातील अनेक भागांमध्ये कंबरभर ते छातीएवढे पाणी साचल्याने जनजीवन पूर्णपणे ठप्प झाले.या महापुरात शेकडो घरे, झोपडपट्ट्या आणि व्यावसायिक आस्थापने पाण्याखाली गेली. भूस्खलन, इमारती कोसळणे, विजेचे धक्के आणि पुराच्या पाण्यात वाहून जाणे अशा विविध कारणांमुळे महाराष्ट्रभर एक हजाराहून अधिक लोकांचा मृत्यू झाला. हजारो कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले. विशेषतः रायगड आणि मुंबई परिसरात अनेक कुटुंबांनी आपले प्रियजन गमावले.या आपत्तीनंतर राज्य सरकार, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, लष्कर, नौदल, स्वयंसेवी संस्था आणि सामान्य नागरिकांनी बचाव व मदतकार्य मोठ्या प्रमाणावर राबवले. या घटनेनंतर मुंबईतील पर्जन्यजल निचरा व्यवस्था, मिठी नदीचे पुनरुज्जीवन, पूर व्यवस्थापन आणि आपत्तीपूर्व तयारी यावर विशेष भर देण्यात आला. २००५ चा मुंबई महापूर हा केवळ अतिवृष्टीचा प्रसंग नव्हता, तर शहरी नियोजन, पर्यावरण संवर्धन आणि आपत्ती व्यवस्थापनातील त्रुटी अधोरेखित करणारा धडा ठरला

## रामचंद : भारतीय क्रिकेटचे धडाडीचे अष्टपैलू

**जन्मदिन विशेष**



भारतीय क्रिकेटच्या इतिहासात गुलाबराय रामचंद यांचे नाव एक प्रतिभावान फलंदाज आणि अष्टपैलू खेळाडू म्हणून आदराने घेतले जाते. त्यांचा जन्म २६ जुलै १९२७ रोजी कराची येथे झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात क्रिकेटची आवड जोपासत त्यांनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर भारतीय संघात स्थान मिळवले आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व केले. गुलाबराय रामचंद यांनी भारतीय क्रिकेट संघासाठी १९५२ ते १९६० या कालावधीत कसोटी सामने खेळले. ते उजव्या हाताचे फलंदाज तसेच प्रभावी मध्यमगती गोलंदाज होते. त्यांच्या खेळात आक्रमकता, आत्मविश्वास आणि संघासाठी योगदान देण्याची वृत्ती दिसून येत असे. त्यांनी भारतीय संघासाठी अनेक महत्त्वाच्या सामन्यांमध्ये उपयुक्त कामगिरी केली.१९५९ मध्ये त्यांनी भारतीय संघाचे नेतृत्वही केले. कर्णधार म्हणून त्यांनी संघाला दिशा देण्याचा प्रयत्न केला आणि भारतीय क्रिकेटच्या संक्रमणाच्या काळात महत्त्वाची भूमिका बजावली. १९५९ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत त्यांच्या नेतृत्वाची कसोटी लागली. त्या काळात भारतीय संघाला परदेशात खेळण्याचा अनुभव कमी होता, तरीही त्यांनी संघभावना आणि संघर्षाची भावना कायम ठेवली.गुलाबराय रामचंद यांच्या कारकिर्दीतील सर्वात उल्लेखनीय कामगिरी म्हणजे १९५२ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या कसोटीत त्यांनी केलेली शानदार फलंदाजी. त्यांच्या खेळामुळे भारतीय संघाला अनेक वेळा संकटातून बाहेर पडण्यास मदत झाली. ते केवळ मैदानावरील खेळाडू नव्हते, तर क्रिकेटच्या तांत्रिक बाबी समजून घेणारे आणि सहकाऱ्यांना प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते.क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतरही त्यांनी खेळाशी आपले नाते कायम ठेवले. प्रशिक्षक आणि मार्गदर्शक म्हणून त्यांनी पुढील पिढीतील खेळाडूंना मार्गदर्शन केले. भारतीय क्रिकेटच्या सुरुवातीच्या काळात योगदान देणाऱ्या खेळाडूंमध्ये त्यांचे स्थान विशेष आहे.गुलाबराय रामचंद यांचे निधन ८ सप्टेंबर २००३ रोजी झाले. मात्र भारतीय क्रिकेटमधील त्यांचे योगदान, नेतृत्वगुण आणि समर्पित वृत्ती आजही क्रिकेटप्रेमींच्या स्मरणात आहेत. भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील एक मेहनती, जिद्दी आणि कर्तृत्ववान खेळाडू म्हणून त्यांचे नाव कायम आदराने घेतले जाईल.

## निझर्णेश्वर विद्यालय कोकणगाव येथे भक्तिमय दिंडी सोहळा उत्साहात



कोकणगाव (प्रतिनिधी) आज, दि. २४ जुलै २०२६ रोजी आषाढी एकादशीचे औचित्य साधत निझर्णेश्वर विद्यालय, कोकणगाव येथे अत्यंत भक्तिमय आणि पारंपरिक वातावरणात दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. मिरवणुकीसाठी माजी विद्यार्थी सुदर्शन शिंगोटे यांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाची सुरुवात अभंगावरील नृत्याने झाली. त्यानंतर संपूर्ण विद्यालय परिसर ज्ञानोबा-तुकाराम, पुंडलिक वरदे हरी विठ्ठल आणि राम कृष्ण हरी या जयघोषांनी दुमदुमून गेला. भगवे झेंडे, तुळशी वृंदावन, कलश, पारंपरिक वेशभूषा, टाळ, मृदुंग आणि भक्तीच्या रंगात न्हालेली विद्यार्थी मंडळी यामुळे विद्यालय परिसरात जणू पंढरपूरच्या वारीचेच दर्शन घडत होते. पालक, ग्रामस्थ आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाख परिधान करून संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताबाई तसेच विठ्ठल-रुक्मिणी यांच्या वेशभूषेत आकर्षक सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी हातात भगवे ध्वज, टाळ आणि तुळशीची रोपे घेऊन शिस्तबद्ध पद्धतीने दिंडीत सहभाग घेतला. दिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी विविध अभंगांवर सुंदर आणि मनमोहक नृत्य सादर केले. संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर यांच्या अभंगांवरील सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. नृत्यामधून विद्यार्थ्यांनी संत साहित्याचा संदेश, भक्ती, समता, प्रेम, बंधुभाव आणि मानवतेची शिकवण प्रभावीपणे सादर केली. विद्यालयाच्या प्रशस्त मैदानावर पारंपरिक रिंगण सोहळा पार पडला. वारकरी परंपरेतील रिंगणाचा अनुभव विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या शिस्तीत आणि उत्साहात रिंगणात सहभाग घेतला. रिंगणावेळी संपूर्ण वातावरण विठ्ठल नामाच्या गजराने भारावून गेले होते. यानंतर विद्यार्थ्यांनी भक्तिगीतांवर आकर्षक लेझीम आणि झांज नृत्य सादर केले. लेझीमच्या तालावर आणि झांजांच्या मंजुळ नादावर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. या संपूर्ण सोहळ्यास विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. राहाणे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. अआधुनिक शिक्षणासोबत संस्कारक्षम शिक्षण देणे ही काळाची गरज असून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे विद्यालयाचे कला शिक्षक श्री. पारासुर यांनी साकारलेली श्री विठ्ठलाची अप्रतिम कलाकृती. रंग, रेखाटन आणि कल्पकतेचा सुंदर संगम असलेल्या या कलाकृतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनीही या कलाकृतीचे कौतुक करत भारतीय कला, संस्कृती आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम अनुभवला. सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. काळे आणि श्रीम. भालेराव यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. विद्यालयातील श्री. पारासुर, श्री. घोडे, श्री. गोसावी, श्री. कांबळे, श्री. खेमनर, श्रीम. पवार, सौ. खताळ, श्री. दिलखुष राहणे आणि श्री. राजू पवार यांनी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व, संत परंपरा, वारकरी संप्रदाय, भारतीय संस्कृती आणि सामूहिक भक्तीचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवता आले. भक्ती, संस्कार आणि सांस्कृतिक जतन यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा दिंडी सोहळा विद्यार्थ्यांच्या मनावर कायमस्वरूपी ठसा उमटवून गेला.

## हरिनाम हरिपाठ आणि अभंगांनी दुमदुमले श्री श्री रविशंकर विद्या मंदिर

संगमनेर, प्रतिनिधी : सुमेरू एज्यूकेशन संचलित श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, संगमनेर येथे आषाढी एकादशी निमित्त वारकरी परंपरेचे संस्कार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेतील अत्यंत महत्त्वाचा उत्सव म्हणजे आषाढी एकादशी. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या पालख्यांसह लाखो वारकरी पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पायी वारी करतात. भक्ती, समता, सेवा, शिस्त आणि मानवतेचा संदेश देणारी ही वारकरी परंपरा महाराष्ट्राच्या संस्कृतीचे वैभव मानली जाते. विद्यार्थ्यांमध्ये या परंपरेबद्दल आदर, भारतीय संस्कृतीची ओळख आणि आध्यात्मिक मूल्यांची जपणूक व्हावी, या उद्देशाने विद्यालयात वारीचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण विद्यालय विठ्ठलनामाच्या गजराने, अभंगांच्या सुरांनी आणि भक्तिमय वातावरणाने भारावून गेले.

कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने झाली. संस्थापिका स्वाती शाह तसेच सचिव समीर शाह, शाळेच्या मुख्याध्यापिका आरती सप्रा आणि उपमुख्याध्यापिका ज्योतिर्मया चव्हाण यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुरेख आणि प्रभावी सूत्रसंचालन इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी अन्वी घुले आणि आराध्या कोटकर यांनी केले. आषाढी एकादशीचे महत्त्व, वारकरी संप्रदायाची परंपरा, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांचे कार्य आणि पंढरपूरच्या वारीचा आध्यात्मिक संदेश यावर इयत्ता नववीतील विद्यार्थिनी वेदांती फटांगरे हिने प्रभावी व विचारप्रवर्तक भाषण केले. तिच्या भाषणातून भक्ती, समता, सेवा आणि मानवतेचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थिनींनी सामूहिक हरिपाठ सादर करून वातावरण भक्तिरसाने भारून टाकले. त्यानंतर बालवाडी ते इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेत आकर्षक सहभाग घेत छोटेखानी दिंडी साकारली. टाळ, भगवे झेंडे, तुळशीमाळ आणि विठ्ठलनामाच्या गजरात लहानग्यांनी सादर केलेली वारी उपस्थितांच्या विशेष पसंतीस उतरली.

इयत्ता चौथी, आठवी आणि नववी च्या विद्यार्थिनींनी विठ्ठलभक्तीपर भजने आणि आरती सादर केली. संगीत शिक्षिका देशपांडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विठ्ठलाचे अभंग सादर केले. अभंग गायनादरम्यान उपस्थितांनीही टाळ्यांच्या गजरात सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि मान्यवरांनी एकत्रितपणे पसायदान म्हटले. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विश्वकल्याणाच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता अत्यंत मंगलमय वातावरणात झाली.

यावेळी मुख्याध्यापिका आरती सप्रा यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, संतपरंपरा आणि वारकरी संप्रदायातील मूल्यांचे महत्त्व सांगितले. उपमुख्याध्यापिका ज्योतिर्मया चव्हाण यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, शिस्त, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची भावना दृढ होत असल्याचे सांगितले. विद्यालयाच्या अध्यक्षा स्वाती शाह आणि सचिव समीर शाह यांनी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाचे कौतुक करत शिक्षकांचे अभिनंदन केले. विशेषतः संगीत शिक्षिका देशपांडे आणि सर्व शिक्षकांनी केलेल्या नियोजनामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला.

कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. भक्ती, संस्कार आणि भारतीय परंपरेचा सुंदर संगम घडवून आणणारा हा आषाढी एकादशीचा सोहळा सर्वांच्या स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.





## निवृत्ती गणपत गवळी यांचे निधन



संगमनेर (प्रतिनिधी) - संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील रहिवासी व सध्या संगमनेर येथे वास्तव्यास असलेले निवृत्ती गणपत गवळी यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८३ वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कै. निवृत्ती गवळी हे माजी सैनिक होते. त्यांच्या पश्चात पत्नी, चार भाऊ, तिन बहिण, चार मुले, मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. भारतीय सैन्य दलात त्यांनी १८ वर्षे कर्तव्य बजावले होते. येथील सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ गवळी, भारतीय जनता पार्टीचे संगमनेर शहर सरचिटणीस भारत गवळी, चंद्रकांत गवळी, सूर्यकांत गवळी, जयश्री खैरनार यांचे ते वडील होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. निवृत्ती गवळी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

HAPPY Birthday



मा.श्री. गुलाबराव जोंधळे
संस्थापक अध्यक्ष - महाराष्ट्र



इजि. अरविंद वैद्य
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर



डॉ. हृषिकेश वाघोलीकर
संचालक, वाघोलीकर हॉस्पिटल



मा. श्री. सुर्यभान गोडसे
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर



मा. श्री. गुरूनाथ बाप्ते
संचालक, गुड मॉर्निंग बेकर्स

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आषाढी एकादशी
निमित्त
सर्वांना मंगलमय शुभेच्छा !
- शुभेच्छुक -
युवा उद्योग समूह



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर — सिल्क अँड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरूम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# टोल प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे; कामे वेळेत पूर्ण न झाल्यास आत्मदहनाचा इशारा

संगमनेर (प्रतिनिधी) - पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील हिवरगाव पावसा टोल नाक्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी सुरू करण्यात आलेले आमरण उपोषण प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले आहे. मात्र, आश्वासनांची मुदतीत पूर्तता न झाल्यास थेट आत्मदहन करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रवीण कानवडे यांनी दिला आहे.



नाशिक-पुणे महामार्गाचे काम सुरू असताना वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर्स, स्ट्रीट लाईट्स, सर्व्हिस रोड तसेच बोगद्यांमध्ये साचणाऱ्या पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था तातडीने करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली होती. याशिवाय महामार्गावरील खड्डे त्वरित बुजविणे आणि रायतेवाडी फाट्यावरील पुलाचे काम लवकर पूर्ण करणे, अशाही मागण्या करण्यात आल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे कार्यकारी अधिकारी श्री. घंटे, अधिकारी दिलीप शिंदे, संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रविण साळुंखे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांच्यासमवेत झालेल्या चर्चेनंतर प्रशासनाने लेखी आश्वासन दिले. त्यानुसार, पुढील सात दिवसांत सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना पूर्ण करण्यात येतील, तर रायतेवाडी फाट्यावरील पुलाचे काम सहा महिन्यांत पूर्ण करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

या लेखी आश्वासनावर विश्वास ठेवून आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रवीण कानवडे आणि विद्यार्थी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गजानन भोसले यांनी दिली.

मात्र, प्रशासनाने दिलेल्या मुदतीत आश्वासनांची पूर्तता केली नाही, तर पुन्हा उपोषण न करता थेट आत्मदहन करण्यात येईल, असा गंभीर इशारा प्रवीण कानवडे यांनी दिला.

यावेळी विद्यार्थी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गजानन भोसले, जिल्हा परिषद माजी सदस्य जनार्दन आहेर, तालुकाध्यक्ष आबासाहेब थोरात, महिला जिल्हाध्यक्ष वैशाली राऊत, महिला शहराध्यक्ष सरला भुजबळ, अक्षय भालेराव, रईस पठाण, मनीष माळवे, अमोल म्हस्के, दिनेश दफेदार, संतोष भुजबळ, गौरव वाळे, नितीन अहिरे, प्रसाद काटे, भाऊ म्हस्के, ज्ञानेश्वर माळी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**जनतेच्या सुरक्षेशी तडजोड नाही**

**हिवरगाव पावसा टोल नाक्यावरील आमरण उपोषण हे कोणत्याही राजकीय स्वार्थासाठी नसून, पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सुरू करण्यात आले होते, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तथा उपोषणकर्ते प्रवीण कानवडे यांनी मांडली. कानवडे म्हणाले, "महामार्गावरील अपूर्ण कामे, खड्डे, दिशादर्शक फलकांचा अभाव, स्ट्रीट लाईट्स नसणे, सर्व्हिस रोडची अपुरी व्यवस्था आणि बोगद्यांमध्ये साचणारे पाणी यामुळे वारंवार अपघात घडत आहेत. नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असताना आम्ही शांत बसू शकत नव्हतो.**

# अकोलेचा नगराध्यक्ष 31 जुलैला ठरणार



अकोले (प्रतिनिधी) - अकोले नगरपंचायतच्या नगराध्यक्ष पदाचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. शुक्रवारी (दि.३१) सकाळी ११ वाजता नगरपंचायत सभागृहात प्रांताधिकारी तथा पिठासीन अधिकारी अरुण उंडे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांचे विरुद्ध दाखल झालेल्या अविश्वास ठरावावर १३ जुलै रोजी झालेल्या नगरपंचायतच्या

विशेष सभेत बारा सदस्यांनी शिक्कामोर्तब केले होते. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष यांचेसह पाच सदस्य या सभेला अनुपस्थित होते. ठरावाला १७ पैकी १२ म्हणजे दोन तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा मिळाल्यामुळे ठराव मंजूर झाला होता. दरम्यान, सहा महिन्यांपासून भाजप अंतर्गत संघर्षामुळे

नगराध्यक्ष वडजे यांना आपले पद गमवावे लागले. त्यामुळे माजी आमदार वैभव पिचड व नगराध्यक्ष वडजे यांना हा धक्का होता. आता नगराध्यक्ष पदाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शुक्रवारी (दि. २४) जाहीर केला आहे. त्यानुसार २७ जुलै रोजी सकाळी ११ ते २ वाजेपर्यंत अध्यक्ष पदासाठी नामनिर्देशन दाखल करावयाचे आहे. याच दिवशी दुपारी २ वाजता दाखल नामनिर्देशनपत्राची छाननी होणार आहे. याच दिवशी सायंकाळी ५ वाजता अवैध ठरलेल्या उमेदवारांची नावे फलकावर लावणे व त्यांना कळविणे.. २८ जुलै रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत

मुख्याधिकारी यांच्याकडे उमेदवारी मागे घेता येणार आहे. आवश्यक अध्यक्षपदासाठी असल्यास ३१ जुलै रोजी सकाळी ११ वाजता नगरपंचायत सभागृहात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. याच दिवशी पिठासीन अधिकारी हे अध्यक्षपदाचा निकाल घोषित करतील. नगराध्यक्ष पदासाठी माजी नगराध्यक्षा सोनाली नाईकवाडी यांच्या नावाची चर्चा आहे. दरम्यान रविवारी मुंबई येथे अकोले तालुक्यातील काही प्रमुख कार्यकर्ते शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. यावेळी भाजपचे आठ बंडखोर सदस्य व शिवसेना उबाठा गटाचे दोन सदस्य अशा दहा नगरसेवकांपैकी कोण शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार? याकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
अत्याधुनिक लॉमिनार
शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटर
• मेंदुविकार शस्त्रक्रिया • किडनी शस्त्रक्रिया
• खुबा प्रत्यारोपण • मुत्रविकार शस्त्रक्रिया
• गुडघा प्रत्यारोपण • दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
• पोटाच्या शस्त्रक्रिया • आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८३७०३८२

दर्शन टेक्स्टाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर
422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या
स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13


कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय् KH
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
अॅम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

दैनिक युवावार्ता BRAND STORIES

## ब्रँड स्टोरीज - यशस्वी उद्योजकांच्या प्रेरणादायी प्रवासाची कहाणी...

प्रत्येक यशस्वी व्यवसायामागे केवळ भांडवल नसते, तर असते दूरदृष्टी, अथक परिश्रम, संघर्ष, सातत्य, धाडस आणि स्वतःवर असलेला अढळ विश्वास. प्रत्येक उद्योजकाची वाटचाल वेगळी असते. कोणीतरी अगदी छोट्या भांडवलातून सुरुवात करून उद्योगविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करतो, तर कोणीतरी अनेक अपयशांवर मात करत यशाचे सर्वोच्च शिखर गाठतो. या प्रत्येक प्रवासात असतात असंख्य अनुभव, कठीण प्रसंग, महत्त्वाचे निर्णय, नवकल्पना आणि प्रेरणा देणारे अनेक क्षण. अशाच प्रेरणादायी यशकथांना समाजासमोर आणण्याचा एक छोटासा प्रयत्न म्हणजे ब्रँड स्टोरीज हे दैनिक युवावार्ताचे विशेष सदर. या सदरामधून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या यशस्वी उद्योजकांचा प्रवास, त्यांच्या व्यवसायाची सुरुवात, आलेल्या अडचणी, त्या अडचणींवर केलेली मात, व्यवसाय विस्तारासाठी अवलंबलेल्या संकल्पना, गुणवत्ता, ग्राहकांचा विश्वास, नेतृत्व, व्यवस्थापन आणि त्यांच्या यशामागील विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



# साईकमल फर्निचर मॉल

**श्री. गणेश सातपुते**
**(संचालक, साईकमल फर्निचर)**

## तुमच्या स्वप्नातील घराला आधुनिकतेचा आणि सौंदर्याचा स्पर्श







आजच्या आधुनिक युगात प्रत्येक व्यक्तीचे एक स्वप्न असते - स्वतःचे सुंदर, आकर्षक आणि सुखसोयींनी सजलेले घर असावे. घर हे फक्त चार भिंतींचे बांधकाम नसते, तर त्या घरात राहणाऱ्या माणसांच्या भावना, आठवणी आणि आनंद यांचे केंद्र असते. घराला सुंदर आणि आकर्षक बनविण्यात फर्निचर व इलेक्ट्रॉनिक वस्तूंची महत्त्वाची भूमिका असते. घरातील सजावट, आरामदायी वातावरण आणि आधुनिक सुविधा या सर्व गोष्टी योग्य दर्जाच्या वस्तूंमुळेच पूर्ण होतात. अशा सर्व गरजांसाठी विश्वासाचे नाव म्हणजे साईकमल फर्निचर मॉल.

संगमनेर शहरात उभा असलेला साईकमल फर्निचर मॉल हा ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेला एक भव्य आणि आधुनिक मॉल आहे. जवळपास ११ हजार चौरस फूट क्षेत्रामध्ये उभारलेला हा विशाल फर्निचर मॉल ग्राहकांना एकाच छताखाली अनेक सुविधा उपलब्ध करून देतो. आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकाला वेळेची किंमत समजते. वेगवेगळ्या वस्तूंसाठी वेगवेगळ्या दुकानांमध्ये फिरण्याऐवजी एकाच ठिकाणी सर्व सुविधा मिळणे ही मोठी सोय आहे. साईकमल फर्निचर मॉलमध्ये ग्राहकांना विविध प्रकारचे फर्निचर, इलेक्ट्रॉनिक्स आणि स्टील भांडी उपलब्ध करून दिली जातात. घरातील हॉल, बेडरूम, किचन किंवा ऑफिससाठी आवश्यक असणारे आधुनिक आणि आकर्षक फर्निचर येथे मिळते. आरामदायी सोफा सेट, सुंदर डायनिंग टेबल, मजबूत बेड, कपाटे, खुर्च्या आणि इतर अनेक वस्तू ग्राहकांच्या पसंतीनुसार उपलब्ध आहेत. प्रत्येक वस्तूमध्ये दर्जा, मजबुती आणि आकर्षक डिझाईन यांचा सुंदर संगम दिसून येतो.

आजच्या काळात इलेक्ट्रॉनिक वस्तूंची आवश्यकता प्रत्येक घरासाठी वाढली आहे. फ्रिज, वॉशिंग मशीन, टीव्ही, कूलर, एसी आणि विविध आधुनिक उपकरणे ही आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनली आहेत. साईकमल फर्निचर मॉलमध्ये ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन नामांकित कंपन्यांच्या आधुनिक इलेक्ट्रॉनिक वस्तू उपलब्ध करून दिल्या जातात. यामुळे ग्राहकांना विश्वासार्ह उत्पादने मिळतात आणि त्यांच्या पैशाचे योग्य मूल्यही मिळते. याशिवाय घरातील स्वयंपाकघरासाठी लागणाऱ्या *स्टील भांड्यांचाही मोठा संग्रह* येथे उपलब्ध आहे. स्वयंपाकघर हे प्रत्येक घराचे हृदय असते आणि त्यासाठी उत्तम दर्जाची भांडी असणे आवश्यक असते. साईकमल फर्निचर मॉलमध्ये विविध आकार, प्रकार आणि गरजेनुसार भांड्यांची उपलब्धता ग्राहकांच्या गरजा पूर्ण करते.

या मॉलचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे नवविवाहित जोडप्यांसाठी उपलब्ध करून दिले जाणारे संसार पॅकेज. लग्नानंतर नवीन संसाराची सुरुवात करताना अनेक वस्तूंची आवश्यकता असते. बेडपासून ते इलेक्ट्रॉनिक्स आणि भांड्यांपर्यंत अनेक गोष्टी एकाच वेळी खरेदी कराव्या लागतात. त्यामुळे वेळ, पैसा आणि नियोजन यांचा मोठा प्रश्न निर्माण होतो. हे लक्षात घेऊन साईकमल फर्निचर मॉलने ग्राहकांसाठी आकर्षक संसार पॅकेजची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेमुळे ग्राहकांना एकाच ठिकाणी सर्व आवश्यक वस्तू मिळतात आणि त्यांचा वेळही वाचतो. साईकमल फर्निचर मॉलची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे ग्राहकांप्रती असलेला विश्वास आणि सेवाभाव. ग्राहकांच्या समाधानाला प्राधान्य देत येथे दर्जेदार वस्तू आणि उत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला जातो. ग्राहकांचे समाधान हेच या संस्थेचे खरे यश मानले जाते.

आजच्या स्पर्धात्मक जगात प्रत्येक व्यवसाय वेगळेपण जपण्याचा प्रयत्न करतो, पण गुणवत्ता, विश्वास आणि ग्राहकांशी असलेले नाते यामुळे साईकमल फर्निचर मॉलने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. घर सजविण्याचे स्वप्न असो, नवीन संसाराची सुरुवात असो किंवा आधुनिक सुविधा घरात आणायच्या असोत - प्रत्येक गरजेचे समाधान येथे मिळते. म्हणूनच जर तुम्हाला तुमच्या घराला आधुनिकतेचा, आकर्षकतेचा आणि सुखसोयींचा स्पर्श द्यायचा असेल, तर **साईकमल फर्निचर मॉल** हे तुमच्यासाठी एक उत्तम ठिकाण आहे. तुमच्या स्वप्नातील घराला नवीन रूप देण्यासाठी आणि विश्वासाने खरेदी करण्यासाठी एकदा जरूर भेट द्या.

# विवान एनर्जी : सोलर ऑन-ग्रिड सिस्टिम

## स्मार्ट ग्राहकांची स्मार्ट निवड

**श्री. अमोल उगले**
**(संचालक, विवान एनर्जी)**



आजच्या वाढत्या वीजदरांच्या युगात प्रत्येकजण विजेच्या खर्चात बचत करणारा आणि पर्यावरणपूरक पर्याय शोधत आहे. अशा वेळी 'विवान एनर्जी' ही संस्था अत्याधुनिक सोलर ऑन-ग्रिड सिस्टिमच्या माध्यमातून ग्राहकांना विश्वासार्ह, किफायतशीर आणि दीर्घकालीन ऊर्जा उपाय उपलब्ध करून देत आहे. स्मार्ट ग्राहकांची, स्मार्ट निवड हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात उतरवत विवान एनर्जीने महाराष्ट्रातील अक्षय ऊर्जा क्षेत्रात आपली एक वेगळी आणि आश्वासक ओळख निर्माण केली आहे.

**विश्वासार्हता आणि दर्जेदार सेवेचा परिपाठ**

सन २०१६ मध्ये स्थापन झालेली विवान एनर्जी ही अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील एक अग्रगण्य आणि विश्वासार्ह सौर ऊर्जा कंपनी आहे. अनुभवी तंत्रज्ञांच्या सक्षम टीमच्या माध्यमातून ही संस्था निवासी (Residential), व्यावसायिक (Commercial) आणि औद्योगिक (Industrial) ग्राहकांना दर्जेदार सौर ऊर्जा प्रणाली उपलब्ध करून देत आहे. विशेष म्हणजे, ग्राहकांच्या गरजेनुसार साइट सर्व्हे, सिस्टीम डिझाइन, सोलर पॅनेल इन्स्टॉलेशन, टेस्टिंग, मेंटेनन्स आणि तांत्रिक मार्गदर्शन अशा सर्व सेवा येथे एकाच छताखाली (End-to-End Solution) दिल्या जातात.

सोलर ऑन-ग्रिड सिस्टिम: बचतीचा हमखास मार्ग

ऑन-ग्रिड सौर ऊर्जा प्रणालीचे अनेक महत्त्वाचे फायदे आहेत:

वीज बिलात ९०% पर्यंत बचत या प्रणालीमुळे ग्राहकांचे मासिक वीज बिल तब्बल ९० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते.

**शासकीय अनुदान** (Subsidy):

घरगुती ग्राहकांसाठी सरकारतर्फे आकर्षक अनुदान उपलब्ध असल्याने ही प्रणाली बसविणे अत्यंत परवडणारे ठरते.

**अल्प देखभाल खर्च:** या संपूर्ण यंत्रणेला देखभालीची (चरळपींशपरपलश) फारशी गरज भासत नसल्याने ग्राहकांचा अतिरिक्त खर्च वाचतो.

**पर्यावरण संवर्धन आणि उज्ज्वल भविष्य**- पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून स्वच्छ आणि हरित ऊर्जेची निर्मिती करणे हा या प्रणालीचा मुख्य उद्देश आहे. या सोलर सिस्टिममुळे कार्बन डायऑक्साइड ($CO_2$) उत्सर्जन जवळपास शून्य राहते. त्यामुळे प्रदूषणमुक्त आणि इको-फ्रेंडली पर्यावरणाच्या निर्मितीत मोलाचे योगदान मिळते. भविष्यातील ऊर्जा गरजांचा विचार करता हा सर्वोत्तम आणि शाश्वत पर्याय मानला जातो.

**३० वर्षांपर्यंतची वॉरंटी आणि २४ तास सपोर्ट**

विवान एनर्जी आपल्या ग्राहकांना केवळ सौर ऊर्जा प्रणाली विकत नाही, तर दीर्घकालीन विश्वास आणि उत्कृष्ट सेवा देते. अत्याधुनिक तंत्रज्ञान, उच्च दर्जाचे साहित्य आणि २४ तास ग्राहक सहाय्य (Customer Support) सेवा यांमुळे प्रत्येक प्रकल्पाची गुणवत्ता आणि कार्यक्षमता सुनिश्चित केली जाते. संस्थेच्या सौर प्रणालींना ३० वर्षांपर्यंतची वॉरंटी मिळत असल्याने ग्राहकांना दीर्घकालीन आर्थिक बचतीचा लाभ मिळतो. भारतातील मुबलक सूर्यप्रकाशाचा प्रभावी वापर करून प्रत्येक घर आणि उद्योग ऊर्जा स्वावलंबी बनू शकतो. विवान एनर्जी स्वच्छ ऊर्जा, आर्थिक बचत आणि पर्यावरण संवर्धन या त्रिसूत्रीवर काम करत अधिक हरित आणि आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी कटिबद्ध आहे.

**आजच आपली ऑर्डर बुक करा!**

**विवान एनर्जी सध्या संगमनेर, छत्रपती संभाजीनगर, सिन्नर, नाशिक आणि अहिल्यानगरसह संपूर्ण महाराष्ट्रात आपली दर्जेदार सेवा देत आहे. वाढत्या वीज बिलांपासून मुक्ती मिळवण्यासाठी आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी आजच सौर ऊर्जेची स्मार्ट निवड करा.**

**संपर्क - विवान एनर्जी**
जय जवान चौक, इंदिरा नगर, मार्केट यार्ड कॉम्प्लेक्स, रसाळ हॉस्पिटलसमोर, संगमनेर
मो. ९१ ७७ ११०० २१००.

## अकोल्याच्या मातीतून पुण्यापर्यंत यशस्वी उद्योजकतेची भरारी

# निखिल एखंडे यांचा प्रेरणादायी प्रवास



एखाद्या व्यक्तीच्या यशामागे केवळ मोठी स्वप्ने नसतात, तर त्यासाठी अथक परिश्रम, दूरदृष्टी, सातत्य आणि गुणवत्तेवर असलेली निष्ठा यांचा मोठा वाटा असतो. अकोले तालुक्याच्या मातीत जन्मलेले आणि आज पुण्यात यशस्वी उद्योजक म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे निखिल एखंडे हे अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. आपल्या जिद्द, मेहनत आणि तांत्रिक कौशल्याच्या जोरावर त्यांनी Neuproel Solutions Pvt. Ltd. या कंपनीच्या माध्यमातून कॉर्पोरेट सुरक्षा आणि आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

ग्रामीण भागातील संस्कार आणि प्रामाणिकपणाची शिदोरी घेऊन निखिल एखंडे यांनी उद्योगविश्वात प्रवेश केला. सुरुवातीच्या संघर्षमय काळात त्यांनी प्रत्येक संधीचे सोनं करत आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा सखोल अभ्यास केला. ग्राहकांच्या गरजा ओळखून गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचा ध्यास त्यांनी घेतला आणि त्यातूनच Neuproel Solutions Pvt. Ltd. या कंपनीचा भक्कम पाया रचला.

आज त्यांची कंपनी कॉर्पोरेट कार्यालये, औद्योगिक प्रकल्प, व्यावसायिक संकुले, शैक्षणिक संस्था तसेच विविध प्रतिष्ठित कंपन्यांसाठी अत्याधुनिक सुरक्षा उपाय उपलब्ध करून देत आहे. उउढत सुरक्षा प्रणाली, Access Control System, Biometric -ttendance, Boardroom आणि Conference Room Solutions, Public Address System, Audio Visual Solutions, BMS आणि ठरलज्ञ खर्पीीरश्रश्रर्रीळेप अशा विविध सेवा कंपनीकडून अत्यंत व्यावसायिक पद्धतीने पुरविल्या जातात. गुणवत्तापूर्ण उत्पादने, तांत्रिक अचूकता आणि विक्रीनंतरची उत्कृष्ट सेवा यामुळे कंपनीने ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. पुण्यातील पिंपरी-चिंचवड परिसरात मुख्य कार्यालय असलेल्या छर्शीीिशिश्र डेश्रीीळेपी झीीं. डींव. ने अल्पावधीतच अनेक प्रतिष्ठित प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत. उद्योग क्षेत्रातील बदलते तंत्रज्ञान आत्मसात करत ग्राहकांना अत्याधुनिक आणि विश्वासार्ह उपाय उपलब्ध करून देणे, हेच कंपनीचे प्रमुख ध्येय राहिले आहे. उद्योजक म्हणून यशस्वी वाटचाल करत असतानाच निखिल एखंडे यांनी विविध सामाजिक आणि व्यावसायिक उपक्रमांनाही पाठबळ दिले आहे. अकोले तालुक्याशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे नाते आजही कायम असून आपल्या मातृभूमीबद्दल त्यांना विशेष अभिमान आहे. ग्रामीण भागातील तरुणांनी मोठी स्वप्ने पाहावीत, कौशल्य विकसित करावे आणि उद्योग क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करावे, असा संदेश त्यांच्या यशस्वी प्रवासातून मिळतो. निखिल एखंडे यांची यशोगाथा ही केवळ एका उद्योजकाची कथा नसून ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ आहे. सातत्य, प्रामाणिकपणा, दर्जेदार सेवा आणि ग्राहकांचा विश्वास या चार मूल्यांच्या आधारावर त्यांनी उद्योगविश्वात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

आज छर्शीीिशिश्र डेश्रीीळेपी झीीं. डींव. हे नाव आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञान क्षेत्रातील विश्वासाचे प्रतीक बनले असून, त्यामागे आहे अकोले तालुक्याच्या सुपुत्राची मेहनत, दूरदृष्टी आणि यशस्वी उद्योजकतेचा प्रेरणादायी प्रवास. भविष्यातही नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करत उद्योगविश्वात अधिक मोठी झेप घेण्याचा त्यांचा निर्धार निश्चितच अनेक उद्योजकांसाठी मार्गदर्शक ठरणारा आहे.



# व्यापार, समाजकारण आणि सेवाभावाचा प्रवास

## नारायण अग्रवाल यांची प्रेरणादायी वाटचाल




व्यवसाय हा केवळ नफा-तोट्याचा व्यवहार नसून तो समाजाशी असलेली बांधिलकी जपण्याचे प्रभावी माध्यम असतो, हे आपल्या कार्यातून सिद्ध करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे नारायण अग्रवाल. व्यापार-उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवताना सामाजिक, धार्मिक आणि विविध जनहिताच्या कार्यात सक्रिय सहभाग घेऊन त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. फेब्रुवारी १९५८ मध्ये (कै.) खेमचंद व सौ. किरणदेवी यांच्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी बी.ए. (ऑनर्स) ही पदवी प्राप्त केली. बालपणापासूनच नेतृत्वगुण, व्यावसायिक दृष्टिकोन आणि समाजसेवेची आवड त्यांच्या स्वभावात होती. याच गुणांनी त्यांना आयुष्यात पुढे यशाच्या शिखरापर्यंत पोहोचविले.

मोठे बंधू (स्व.) गुलाबचंद अग्रवाल यांच्या मार्गदर्शनातून त्यांनी व्यवसायाचे धडे घेतले. सुरुवातीच्या काळात बाजारपेठेत तीव्र स्पर्धा असतानाही त्यांनी प्रामाणिक व्यवहार, ग्राहकांशी विश्वासाचे नाते आणि दूरदृष्टीच्या बळावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. ब्रँडेड चहाच्या वाढत्या स्पर्धेतही त्यांनी अग्रवाल चहा कंपनीला सर्वसामान्य ग्राहकांपर्यंत पोहोचवले. शहरासह ग्रामीण भागात मजबूत नेटवर्क उभे करत त्यांनी चहाच्या व्यवसायात महत्त्वाचे स्थान मिळवले. त्यांच्या व्यवसायामुळे अनेकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या.

व्यवसाय करताना विविध समस्यांनाही त्यांनी धैर्याने सामोरे गेले. व्यापाऱ्यांच्या प्रश्नांसाठी ते नेहमीच आघाडीवर राहिले. जकात कर रद्द करण्यासाठी आंदोलन, व्यापाऱ्यांना होणाऱ्या प्रशासकीय त्रासाविरोधात लढा, तसेच शहरातील समस्या सोडवण्यासाठी अभिनव गांधीगिरीचा मार्ग त्यांनी स्वीकारला. व्यापाऱ्यांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

सन २००६ मध्ये गोदावरी नदीला आलेल्या महापुरामुळे शहरातील व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्या वेळी व्यापाऱ्यांना शासकीय मदत मिळावी यासाठी त्यांनी ठाम भूमिका घेतली. त्यांच्या पाठपुराव्यामुळे व्यापाऱ्यांनाही आर्थिक मदत मिळाली. संकटाच्या काळात व्यापाऱ्यांच्या पाठीशी उभे राहणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली.

समाजसेवेच्या क्षेत्रातही त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. कोरोना काळात मास्क व वाफेच्या मशीनचे वितरण, मकरसंक्रांतीच्या निमित्ताने दुचाकीस्वारांना सुरक्षापट्टे वाटप, गरजूंना ब्लँकेट वाटप, वृत्तपत्र विक्रेत्यांना रेनकोट वाटप अशा अनेक उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये अन्नदान, खिचडी वाटप तसेच विविध सेवाभावी उपक्रमांना त्यांनी उदारपणे मदत केली आहे. महिलांसाठी कार्य करणाऱ्या विविध उपक्रमांना त्यांनी सातत्याने प्रोत्साहन दिले आहे. सामाजिक संस्थांना मदत, जनहिताच्या कामांत सहभाग आणि विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्याची त्यांची भूमिका उल्लेखनीय आहे.

व्यापाऱ्यांच्या हितासाठी कार्य करताना त्यांनी विविध संस्थांमध्येही महत्त्वाची पदे भूषविली आहेत. कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष, विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच अनेक जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. समाजसेवा हीच खरी जबाबदारी मानून त्यांनी आपल्या पदांचा उपयोग समाजहितासाठी केला. त्यांच्या यशस्वी वाटचालीत पत्नी सुषमा, मुली नेहा व निकिता, मुलगा वीरेश आणि सून पूजा यांचेही मोलाचे योगदान आहे. कुटुंबीयांच्या सहकार्यामुळे त्यांचा सेवाभावाचा प्रवास अधिक समृद्ध झाला आहे.

व्यवसायातील यश, सामाजिक बांधिलकी, जनसेवेची तळमळ आणि लोकांशी जोडलेले नाते यामुळे नारायण अग्रवाल हे अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत. व्यापारासोबत समाजकारणाची सांगड घालत त्यांनी निर्माण केलेला आदर्श निश्चितच भावी पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरेल.




अकोले नगरपंचायतीच्या माजी नगराध्यक्षा
तालुक्याचा बुलंद आवाज
सौ.सोनालीताई
चेतन नाईकवाडी
यांची
भाजप महिला मोर्चा
अहिल्यानगर ग्रामीण च्या
'सचिव' पदी निवड
झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन!
-शुभेच्छुक -
भारतीय जनता पार्टी
अहिल्यानगर